# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - आईचे संगीतायन
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. रेणुका अनिरुद्ध मुळे

मनीचे गुज- शब्द- भाव
उलगडती जीवन जैसे
श्वासा श्वासात संगीत
रुजते बहरते तैसे

आईच्या गर्भात आरंभ जीवनाचा
अंगाईतून रुजवते ती
ध्यास जगण्याचा
पहिला श्वास तिचा “ सा ”

संसारातून घडविते जणू
विणते एक एक धागा मनाचा
ध्यास ममतेचा
दुसरा श्वास तिचा “ रे ”

कसे जगावे याचे ज्ञान
ती देते वास्तवाचे भान
ध्यास शिक्षणाचा
तिसरा श्वास तिचा “ ग ”

आकार देते जीवनास
सदगुणांचा वसा खास
ध्यास सुसंस्कृततेचा
चौथा श्वास तिचा “ म ”

अनन्यभावे प्रेम तिचे
मनास धडे शिस्तीचे
ध्यास कर्तव्याचा
पाचवा श्वास तिचा “ प ”

नकळत रुजवते बीज मायेचे
बांधून बंध नात्यांचे

Anahat Music Therapy

## ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

ध्यास जोडण्याचा
सहावा श्वास तिचा “ ध ”

परिपूर्णता जगण्याचे गमक
जसे सुरांचे सप्तक
ध्यास साफल्याचा
सातवा श्वास तिचा “ नी ”

अवघे जीवन समर्पण
उतराई न होई तिचे ऋण
जीवनाचे संगीतायन
आई हेच पसायदान
आई हेच पसायदान.......

Anahat Music Therapy